# प्रेसनोट

दिनांक ०६/०४/२०२०

आज दिनांक ०६/०४/२०२० रोजी पोलीस आयुक्त कार्यालय पिंपरी चिंचवड येथे पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व धर्मिय प्रतिनिधी, प्रतिष्ठीत व्यक्ती, विविध राजकीय पक्षाचे व संस्थांचे प्रतिनिधी यांना बोलाविण्यात आले होते. सदर वेळी पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई व महानगरपालिका आयुक्त श्री. श्रवण हर्डिकर यांनी उपस्थितांना कोरोना व्हायरसच्या बचावासाठी काय केले पाहीजे, याबद्दल माहिती दिली.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सोशल डिस्टंसिंगचे महत्व व त्याची आवश्यकता, होम कोरोटाईन केलेल्या लोंकासाठी सुचना, जे लोक बाधित लोंकाच्या संपर्कात आलेले आहेत त्यांनी काय करावे याबाबत महानगरपालिका आयुक्त श्री. श्रवण हर्डिकर यांनी माहिती दिली व सर्व नागरिकांनी आत्तापर्यंत चांगले सहकार्य केले असुन असेच सहकार्य पुढे देखील करावे असे सांगितले.

शासनाकडुन लागु करण्यात आलेल्या लॉकडाऊनचा भंग केल्यास पोलीस कारवाई करतील व त्यामुळे भविष्यात संबधीत व्यक्तीला नोकरी वा इतर ठिकाणी त्याचा त्रास होऊ शकतो याबद्दल पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई यांनी उपस्थितांना माहिती दिली तसेच त्यांनी येणाऱ्या काळात साजरे होणारे सण जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती, हनुमान जयंती व शब्बे ए बारात हे सार्वजनिकरित्या साजरे न करण्याबाबत सुचना दिल्या.

उपरोक्त सुचना या समाजातील इतर लोंकापर्यंत पोहचविण्याबाबत उपस्थितांना आवाहन करण्यात आले. सर्व उपस्थितांनी प्रशासनाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करुन उपरोक्त संदेश समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचविण्याचे आश्वासन दिले. सदर वेळी अपर पोलीस आयुक्त, श्री.रामनाथ पोकळे व पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री. सुधीर हिरेमठ असे उपस्थित होते.

(श्रीधर जाधव)
सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-२
पिंपरी चिंचवड

06/04/2020

Scanned by CamScanner